महाराष्ट्र शासन,
सहसंचालक,उच्च शिक्षण,जळगाव विभाग, जळगाव
महाराष्ट्र जीवन प्राधीकरण इमारत,(पहिला मजला), जळगांव-४२५००१
दुरध्वी व फॅक्स क्रमांक (०२५७-२२३८५१०) E-mail-jdhejal@yahoo.co.in

जा.क/ससं,उशि/एचटीईसेवार्थ/ 2019-20/269 दिनांक.१२.०१.२०२०

प्रति,

कुलसचिव,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव
सर्व प्राचार्य,
अशासकीय अनुदानित कला वाणिज्य व विज्ञान विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
जळगांव धुळे नंदुरबार जिल्हा,

विषय :- एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये येणा-या अडचणी दूर करणेबाबत

संदर्भ.१. मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/अमवि/२०१९/एचटीई सेवार्थ तां. माहिती/मवि-२ दि. १७.१.२०१९

२.मा. संचालनालयाचे पत्र क्र. /अमवि/२०२०/एचटीई सेवार्थ मासिक अह/मवि-२ दि. ५.२.२०

३. या कार्यालयाचे पत्र क्र. ससं.उशि/एचटीईसेवार्थ/२०१९-२०/२४० दि. ५.०२.२०२०

उपरोक्त विषयाअन्वये अकृषी विद्यापीठ तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना वरील पत्र क्र.३ अन्वये एचटीई सेवार्थ प्रणालीमधील येणा-या तांत्रिक अडचणी आपणास कळविण्यात आलेले होत. परंतु अद्याप कुणाचेही प्रस्ताव या कार्यालयात प्राप्त झालेले नाहीत.

या पत्राद्वारे आपणास पुनश्च आदेशित करण्यात येते कि, ज्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे एचटीई सेवार्थ प्रणालीत काही तांत्रिक अडचणी निर्माण असलेले (उदा.७ व्या वेतन आयोगानुसार होत नसलेले बदल) अशा सर्व कर्मचा-याचे एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये (Lodge Compalint) वर तक्रार नोंदवावी व (Lodge complaint) तक्रार नोंदल्यानंतर सोबत जोडलेल्या नमुन्यात संपूर्ण माहिती तात्काळ या कार्यालयात सादर करावी.

सोबत-तक्रार नोंद विवरण

सहसंचालक,
उच्च शिक्षण,
जळगांव विभाग जळगांव

Scanned by CamScanner

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||


**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University,Jalgaon**

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

**परीक्षा गोपनीय (पूर्वार्ध) विभाग**

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

दूरध्वनी क्र. [illegible]
फॅक्स क्र. [illegible]
वेब साईट : www.nmu.ac.in


जा.क्र.कबचौउमवि/७-फ/५३९५/२०१८ दिनांक २०/१२/२०१८

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी
संलग्नीत सर्व विधी व शिक्षणशास्त्र या अभ्यासक्रमाकरीता
माहे डिसेंबर,२०१८ व जानेवारी, २०१९ मध्ये होणा-या
परीक्षेचे केंद्र असलेली महाविद्यालयांचे **मा.प्राचार्य यांना...**

**विषय: विद्यापीठाच्या नवीन संगणकीय प्रणालीद्वारा प्रश्नपत्रिका महाविद्यालयास On line पाठविणेकरीता प्रशिक्षण घेणेबाबत...**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विदित करण्यात येते की, विद्यापीठामार्फत **दि.२६/१२/२०१८** पासून शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या लेखी परीक्षा व **दि. ३१/१२/२०१८** पासून विधी अभ्यासक्रमाच्या परीक्षा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. यापूर्वी सदर अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिका C.D. द्वारे DES Cell मार्फत एक तास अगोदर आपल्या परीक्षा केंद्रावर Uploading करण्यात येत असत. तद्नंतर आपल्या महाविद्यालयाकडून संबंधित परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिका Download करुन ते झेरॉक्स करुन विद्यार्थ्यांना वितरीत करीत असत.

या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, नवीन संगणकीय कार्यप्रणालीद्वारा महाविद्यालयास प्रश्नपत्रिका Download करावयाची असल्यामुळे आपल्या महाविद्यालयातील परीक्षेचे कामकाज पाहणारे व संगणकीय ज्ञान असलेले (I.T.Co-ordinator) संबंधित कर्मचारी यांना विद्यापीठात प्रशिक्षण घेणेकरीता **शुक्रवार,दि.२१/१२/२०१८ रोजी दुपारी ठिक २.०० वाजता** विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीत **दृकश्राव्य कक्ष** येथे उपस्थित राहण्यास अवगत करावे. या नवीन संगणकीय प्रणालीकरीता In Built Web Camera असलेला Laptop आवश्यक आहे.

तेव्हा, वरील कार्यप्रणालीसाठी विद्यापीठात उपस्थित राहतांना In Built Web Camera असलेला Laptop सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच विद्यापीठाने पुरविलेला तक्ता देखील भरुन आणणे आवश्यक आहे, तसेच Soft Copy in Excel Format descell@nmu.ac.in या e-mail वर पाठवावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(भ.प्र.पाटील)
**संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**सोबत : तक्ता**

**प्रत माहितीसाठी :**

१. मा.कुलगुरु महोदय कार्यालय, कबचौउमवि,जळगाव
२. मा.प्र-कुलगुरु महोदय कार्यालय, कबचौउमवि,जळगाव
३. प्र.संगणक केंद्र प्रमुख, कबचौउमवि,जळगाव - यांना कळविण्यात येते की, वरील प्रशिक्षणासाठी योग्य ती पूर्व तयारी करुन उपस्थित प्रतिनिधींना मार्गदर्शन करावे.

My Computer E:\grs\Exam-Pre_Section\circular\msw\pg.18 dtd.201218


Scanned by CamScanner

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University,Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)
## परीक्षा गोपनीय (पूर्वार्ध) विभाग

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

दूरध्वनी क्र. : [illegible]
फॅक्स नं. : [illegible]
वेब साईट : www.nmu.ac.in

दिनांक ०१/११/२०१९

जा.क्र.कबचौउमवि/७-फ/५१६८/२०१९

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी
संलग्नीत सर्व **पदव्युत्तर कला,विज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र / शिक्षणशास्त्र / विधी / अभियांत्रिकी / ऑर्किटेक्चर / औषधनिर्माणशास्त्र व बी.व्होक** इ.अभ्यासक्रमाकरीता
माहे नोव्हेंबर / डिसेंबर, २०१९ मध्ये होणा-या परीक्षेचे केंद्र असलेली सर्व
महाविद्यालयांचे **मा.प्राचार्य / मा.संचालक यांना...**

**विषय: नवीन संगणकीय कार्यप्रणालीद्वारे प्रश्नपत्रिका महाविद्यालयास On line पाठविणेकरीता आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहणेबाबत....**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विदित करण्यात येते की, विद्यापीठामार्फत दि. **१९/११/२०१९** पासून खालील अभ्यासक्रमाच्या लेखी परीक्षा टप्प्या-टप्प्याने आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

**M.A., M.Com., M.Sc. MCA, MBA, MCA- 5 years Integrated Course, Education, Law, Engineering / Architecture, Pharmacy & B.Voc. इ.**

माहे मार्च / एप्रिल / मे,२०१९ मध्ये झालेल्या वरील सर्व अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षांच्या प्रश्नपत्रिका परीक्षा विभागाने नवीन संगणकीय कार्यप्रणालीद्वारे ऑनलाईन पाठविलेल्या आहेत व सदरच्या परीक्षा सुरळीतपणे यशस्वीरित्या पार पडलेल्या आहेत.

या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, नवीन संगणकीय कार्यप्रणालीद्वारे प्रश्नपत्रिका Download करावयाची कार्यपध्दती उपरोक्त सर्व महाविद्यालयांना अवगत झालेली आहे. तरी देखील वरील **महाविद्यालयातील प्रतिनिधींना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.** करिता, आपल्या महाविद्यालयातील परीक्षेचे कामकाज पाहणारे व संगणकीय ज्ञान असलेले **(I.T.Co-ordinator)** संबंधित कर्मचारी यांच्यासाठी **सोमवार, दि.११/११/२०१९ रोजी दुपारी ठिक २.०० वाजता** विद्यापीठाच्या **दृकश्राव्य कक्ष** येथे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला असून, सदर कार्यशाळेत आपल्या महाविद्यालयातील प्रतिनिधींना अवश्य उपस्थित राहण्यास अवगत करावे.

या नवीन संगणकीय कार्यप्रणालीकरीता In Built Web Camera असलेला Laptop आवश्यक आहे. Laptop नसल्यास संगणकास USB Web Cam जोडलेला असणे आवश्यक आहे. तसेच या कार्यप्रणालीकरीता परीक्षा केंद्राचे e-mail account हे g-mail चेच असणे आवश्यक आहे.

तेव्हा वरील कार्यप्रणालीसाठी विद्यापीठात उपस्थित राहतांना In Built Web Camera असलेला Laptop सोबत आणल्यास त्यात Software त्वरीत Installed करुन देण्यात येईल. तसेच विद्यापीठाने पुरविलेला तक्ता देखील भरुन आणणे आवश्यक आहे व त्याची Soft Copy in Excel Format descell@nmu.ac.in या e-mail वर पाठवावी. या ई-मेलवर I.T.Co-ordinator यांचा Passport Photo ची सॉफ्टकॉपी (JPG Format) देखील पाठवावी. सदर फाईलला नाव देण्यासाठी College Code व कर्मचा-याचे नाव असणे आवश्यक आहे (for Ex.100001_msnile.jpeg) याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासु,

Bhatuprasad Prabhakar Patil

(भ.प्र.पाटील)
**संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**सोबत : तक्ता**

**प्रत माहितीसाठी :**
१. मा.कुलगुरु महोदय कार्यालय, कबचौउमवि,जळगाव
२. मा.प्र-कुलगुरु महोदय कार्यालय, कबचौउमवि,जळगाव
३. श्री.एम.एस.निळे, विशेष कार्य अधिकारी, संगणक विभाग,कबचौउमवि,जळगाव - यांना कळविण्यात येते की, वरील प्रशिक्षणासाठी योग्य ती पूर्व तयारी करुन उपस्थित प्रतिनिधींना मार्गदर्शन करावे.

*My Computer/E:\grl\Exam-Pre_Section\circular\nmu\pg 53 dtd.011119*

Scanned by CamScanner

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||


कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University,Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)


## परीक्षा गोपनीय (पूर्वार्ध) विभाग

जा.क्र.कबचौउमवि/७-फ/३२७१/२०१९ दिनांक २१/०६/२०१९

प्रति,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत
सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य /मान्यता प्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक /
विद्यापीठ शैक्षणिक विभाग व प्रशाळेतील मा.संचालक यांना...

**विषय:** विद्यापीठाच्या संगणकीय प्रणालीशी (OAASIS) संलग्नीत होणेबाबत...

**संदर्भ :** (१) विद्यापीठाचे जा.क्र.उमवि/२१/अ.मं./११६/२०१४, दि.०३/०७/२०१४ चे परिपत्रक.
(२) जा.क्र.उमवि/७-अ/३१०१/२०१७, दि.२५/०७/२०१७
(३) जा.क्र.कबचौउमवि/७-फ/५११६/२०१८, दि.१७/१२/२०१८

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास विदितच आहे की, विद्यापीठाच्या परीक्षेसंबंधी विविध कामांमध्ये सुसूत्रता येण्याच्या दृष्टीने OAASIS ही संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली असून, त्याद्वारे विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये व परिसंस्थेतील प्राध्यापकांशी पत्रव्यवहाराद्वारे तात्काळ थेट संबंध प्रस्थापित करता येतात. याबाबत आपणास वरील संदर्भीय पत्रान्वये वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.

तथापि, असे निदर्शनास आले आहे की, अद्यापपावेतो ब-याच प्राध्यापकांनी आपले नाव संगणकीय प्रणालीसाठी **Registration** केलेले नाही. त्यामुळे परीक्षेशी संबंधित पत्रव्यवहार तात्काळ करता येत नाही. तेव्हा आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधित प्राध्यापकांना तात्काळ OAASIS प्रणालीशी Registration करणेबाबत तातडीने निर्देश देण्यात यावेत. जेणेकरुन सदर कार्यप्रणालीत सुलभता येईल. तसेच यापूर्वी सदरच्या माहितीमध्ये काही प्राध्यापकांनी अपूर्ण माहिती भरल्याचे निदर्शनास आले आहे ती खालीलप्रमाणे

(१) काही प्राध्यापक निवृत्त / मयत / महाविद्यालये सोडून गेल्यानंतरही महाविद्यालयाने त्यांचे नाव सदर प्रणालीतून वगळलेले नाहीत.

(२) काही प्राध्यापकांनी मोबाईल नं. व ई-मेल आय.डी.चुकीचे दिलेले आहेत.

(३) काही प्राध्यापकांनी अनुभव तसेच शैक्षणिक अर्हता, कोणते विषय शिकवितात त्याची माहिती Specialization इ. माहिती चुकीची नमूद केलेली आहे.

वरील प्रमाणे **Registration** व माहिती भरण्यासाठी http://affiliation.oaasisnmu.org या वेब साईटवर जाऊन महाविद्यालयाचा लॉगीन आय.डी. व पासवर्ड टाकावा, त्यानंतर ई-परीक्षा विभाग ही लिंक दिसेल. त्यावर क्लिक करुन **Confirmation** साठी पुन्हा पासवर्ड टाकावा, त्यानंतर **Update Courses Taught** ही लिंक दिसेल. त्यावर क्लिक केल्यानंतर प्राध्यापकांची यादी येईल. त्याठिकाणी **Update Information** वर क्लिक करावे आणि **Courses, Branch,Course Part (I & II ), Part Term, Paper, Year** इ. नुसार माहिती भरुन शेवटी **Done** वर क्लिक केल्यास विद्यापीठास माहिती प्राप्त होईल.

सदर माहितीमध्ये प्राध्यापकांनी अचुक मोबाईल नं. व ई-मेल आय.डी.देणे आवश्यक आहे. तसेच प्राध्यापकांनी Subject Specialization व अनुभव इ.ची माहिती भरणे आवश्यक आहे. या माहितीचा उपयोग परीक्षा विभागाकडून पॅनेल तयार करण्यासाठी व गोपनीय कामासाठी आवश्यक असल्यामुळे व **सद्यस्थितीत पॅनेल तयार करण्याचे काम सुरु असल्यामुळे प्राध्यापकांनी सर्व माहिती तपशिलवार व अचूक भरावी.** व ज्या प्राध्यापकांची माहिती अचूक नसल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्राध्यापक व महाविद्यालयाची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

ज्या प्राध्यापकांची नावे संगणकीय यादीत दिसत नसल्यास ती **OAASIS System** मध्ये समाविष्ठ करण्यात यावीत व त्यांचीही माहिती संगणकीय **Programme** मध्ये भरण्यात यावी. व सर्व प्राध्यापकांची माहिती परिपूर्ण भरल्याची मा.प्राचार्य यांनी खात्री करुन घ्यावी. सदरची माहिती ही **दि. ३० जुन, २०१९** पर्यंत **Internet Explorer (Version 8)** या ब्राऊझरवरुन भरण्यात यावी, ही विनंती.

कळावे,

सर्व प्राध्यापकांना या मेलने कळवावे. नोंद घ्यावी व कार्यवाही

आपला विश्वासू,
Sd/-xxx
(भ.प्र.पाटील)
**संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

... College ...khede I/E
Inward No. 417
Date 20/6/2019

24.6.19
Staff file

**प्रत माहितीसाठी :**

Scanned by CamScanner

जा. क्र. कबचौउमवि/७-ग/जन-२८(३)/एमकेसीएल परिपत्रक/३०। ८/२०१९ दिनांक:-१६/०५/२०१९

प्रति,

१) मा.प्राचार्य/प्राचार्या/संचालक/संचालिका,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी सर्व संलग्नीत महाविद्यालये व परिसंस्था

२) मा. संचालक/विभाग प्रमुख , सर्व शैक्षणिक प्रशाळा,कबचौउमवि,जळगाव

**विषय :- ई-सुविधा योजने अतंर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे Online प्रवेश करणे व ई-सुविधा शुल्काबाबत..**

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.ईसेवा/२००६/ (१९१/०६) मशि-१) दि.१९/०६/२००६

२) जा.क्र.उमवि/७-ग/MKCL/१५६५/२००९ दि.१६/०४/२००९

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मला प्राप्त आदेशानुसार कळविण्यात येते की, कबचौउमवि अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना ई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात वरील संदर्भीय शासन निर्णयानुसार, एमकेसीएल सोबत विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २००७-२००८ पासून सामजंस्य करार केलेला आहे. या करिता एमकेसीएलने Digital University Portal विकसीत केलेले असून या Portal व्दारे विद्यार्थ्यांना ई-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. (http://nmuj.digitaluniversity.ac) तसेच विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी, स्पर्धात्मक परीक्षेची माहितीचा समावेश असलेले EASY Portal, एमकेसीएलद्वारा विकसित केलेले आहे. ई-सुविधा अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना कोणकोणत्या सुविधा उपलब्ध असतात याबाबतचा संपूर्ण तपशिल संदर्भीय पत्र क्रमांक २ नुसार सर्व महाविद्यालयांना कळविण्यात आलेला आहे.

या योजनेचा विद्यार्थ्यांना लाभ घेता यावा याकरिता शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये खालील वर्गाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांकडून ई-सुविधा शुल्क रू ५०/- हे संदर्भीय शासन निर्णय क्र.१ नुसार आकारण्यात यावी. विद्यार्थ्यांकडून जमा केलेले ई-सुविधा शुल्क हे प्रथम वर्षांच्या पात्रता अर्जासह आणि इतर वर्गाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीसह विद्यापीठ कार्यालयात प्रथम वर्षाच्या पात्रता अर्जासोबत जमा करावे.

**१) प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष कला, विज्ञान, वाणिज्य. B.Voc(सर्व विषय), B.S.W., B.Sc. Actuarial Science (शैक्षणिक प्रशाळा), B.A. MCJ.**
**२) प्रथम, द्वितीय,तृतीय व चतुर्थ वर्ष अभियांत्रिकी. औषधनिर्माण विद्याशाखा, B.Arc., B.Tech (Cosmetic)**
**३) प्रथम व द्वितीय शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र.(B.Ed.,B.P.Ed, M.Ed, M.P.Ed, B.P.E, B.Ed. (Special)**
**४) प्रथम,द्वितीय तृतीय,चतुर्थ व पाचवे वर्ष बी.ए.एलएल.बी., प्रथम,द्वितीय व तृतीय वर्ष एल.एल.बी., L.L.M**
**५) प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष, बीएमएस.,बीएमएस (ई-कॉमर्स.), बीबीए. बीसीए.**
**६) प्रथम, द्वितीय वर्ष एम.एम.एस.,(कॉम्प्यूटर मॅनेजमेन्ट),एमबीएम (पर्सोनेल मॅनेजमेन्ट),**
**७) प्रथम, द्वितीय वर्ष M.B.A. व प्रथम, द्वितीय व तृतीय M.C.A. (शैक्षणिक प्रशाळा व महाविद्यालयांकरिता) M.B.A. , M.C.A.(Integrated)**
**८) प्रथम व द्वितीय वर्ष M.A.,M.Com, M.Sc,M.S.W. (शैक्षणिक प्रशाळा व महाविद्यालयांकरिता), B.F.A, M.F.A**
**९) अध्यादेश १८१ नुसार नव्याने सुरु झालेला GST कोर्स**
**१०) प्रथम,द्वितीय,तृतीय व चतुर्थ वर्ष B.Tech (शैक्षणिक प्रशाळा)**
**११) प्रथम व द्वितीय वर्ष M.E., M.Pharm व M.Tech (शैक्षणिक प्रशाळा)**

पदवी स्तरावरील प्रथम वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून Online Applicaton पध्दतीने प्रवेश प्रक्रिया पुर्ण करुन घ्यावी. जे विद्यार्थी ऑनलाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरतील त्यांची माहिती Digital College Login मधून नव्याने भरण्याची आवश्यकता राहणार नाही. महाविद्यालयांनी त्यांच्या लॉगीनमधून विद्यार्थ्याने भरलेली माहिती जसे-विद्यार्थ्यांचे नाव (इ.१२ वी उत्तीर्ण प्रमाणपत्रावरील नाव व पदवी परीक्षेसाठीचे नाव) निवडलेला विषय,वैकल्पीक विषय,महाविद्यालयात शिकविले जाणारे विषय आदी बाबींची माहिती तपासून व पडताळणी करुन घेण्यात यावी. उपरोक्त सर्व बाबींच्या पुर्ततेनंतर विद्यार्थ्यांचा प्रथम वर्षाचा प्रवेश College Login मधून अंतीम व निश्चित (Confirm) करण्यात यावा. सदर प्रवेश मंजूर प्रवेश क्षमते इतके करावे. तसेच विद्यापीठ परिपत्रक १०/१९९८ नुसार प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्याची मागील परीक्षेची संपादणूक रद्द

Scanned by CamScanner

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

परीक्षा गोपनिय उत्तरार्ध विभाग

जा.क्र.:उमवि/७-आय/केंमुप्र/ ५२४३/२०१८

दिनांक:- १२ /१२/२०१८

प्रति,
मा.प्राचार्य
कबचौउमविशी संलग्न सर्व कला,विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालये यांना..

विषय :- On Screen Evaluation कार्यपध्दतीकरीता मूल्यमापन केंद्र निश्चित करणे संदर्भात ...

संदर्भ:- विद्यापठाचे पत्र जा.क्र.:उमवि/७-आय/केंमुप्र/४९८६/२०१८ दिनांक:- १६ /११/२०१८चे पत्र

महोदय,

On Screen Evaluation कार्यपध्दतीच्या अंमलबजावणीसाठी मूल्यमापन केंद्रे निश्चित करण्यात आली असून सदरची केंद्र व त्या केंद्रांना जोडलेली महाविद्यालये व अभ्यासक्रम याबाबत विद्यापीठाच्या वरील संदर्भीय पत्रान्वये विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना व परिसंस्थांना कळविण्यात आले आहे.

माहे ऑक्टो./नोव्हें.२०१८ च्या परीक्षेपासून M.A. या अभ्यासक्रमाचे मूल्यांकन देखील On Screen Evaluation च्या कार्यपध्दती नुसार करणेबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या अनुषंगाने On Screen Evaluation कार्यपध्दतीच्या अमंलबजावणीसाठी जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हानिहाय पुढील प्रमाणे केंद्रे निश्चित करण्यात आली आहे.

| अ.क्र. | केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प असलेले महाविद्यालयाचे नाव | महाविद्यालयास जोडलेल्या महाविद्यालयांच्या शहरांची नावे | अभ्यासक्रम (वर्ग) |
|---|---|---|---|
| ०१ | मुळजी जेठा महाविद्यालय,जळगाव | जळगाव व एरंडोल, शहरातील महाविद्यालये | एम.ए. |
| ०२ | भुसावळ कला, विज्ञान आणि पु.ओ.नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ | भुसावळ, यावल,रावेर,फैजपूर,ऐनपूर भालोद,वरणगाव,मुक्ताईनगर, जामनेर,शेंदूर्णी व बोदवड शहरातील महाविद्यालये | एम.ए. |
| ०३ | राष्ट्रीय शिक्षण प्रसारक मंडळाचे नानासाहेब यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चाळीसगाव | चाळीसगाव व पाचोरा शहरातील महाविद्यालये | एम.ए. |
| ०४ | कि.वि.प.संस्थेचे किसान महाविद्यालय, पारोळा | पारोळा, भडगाव व धरणगाव शहरातील महाविद्यालये | एम.ए. |
| ०५ | खान्देश शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रताप महाविद्यालय, अमळनेर | अमळनेर,चोपडा, मारवड शहरातील महाविद्यालये | एम.ए. |
| ०६ | कै.क.डॉ.पां.रा.घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे | धुळे, नगाव,साक्री, म्हसदी,कुसुंबा, सोनगीर शहरातील महाविद्यालये. तसेच धुळे व नंदुरबार जिल्हयातील सर्व विधी, शिक्षणशास्त्र विद्याशाखेची महाविद्यालये | एम.ए. |
| ०७ | एस.पी.डी.एम.चे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,शिरपूर | शिरपूर, शिंदखेडा, नरडाणा व थाळनेर शहरातील महाविद्यालये | एम.ए. |

संबंधित प्राध्यापक - कार्य नोंद द्यावी
१५/१२/१८

Scanned by CamScanner

आपले स्वागत आहे

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.कबचौउमवि/ 05/शिष्यवृत्ती / 435/2018 दि.25/08/2018

अत्यंत महत्वाचे (शिष्यवृत्ती प्राधान्य)

प्रति,

मा.प्राचार्य,कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये /परिसंस्था

मा.संचालक / विभाग प्रमुख, सर्व शै.प्रशाळा / विभाग,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

विषय :सन 2018-19मध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता व इत्तर उच्च शिक्षण विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ :1. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण म.रा.पुणे यांचे दि.31/07/2018चे पत्र

2. मा.सहसंचालक, उच्च शिक्षण जळगाव विभाग जळगाव यांचे दि.09/08/2018चे पत्र

3. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण म.रा.पुणे यांचे दि.10/08/2018चे पत्र

महोदय / महोदया,

सन 2018-19 मध्ये उच्च शिक्षण विभागाच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शूल्क शिष्यवृत्ती योजना व इतर शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी दि. 07/08/2018 रोजी सकाळी 11.00 वाजता मा.संचालक, उच्च शिक्षण म.रा.पुणे. यांचे दालनात विद्यापीठ स्तरावर नेमण्यात आलेल्या नोडल अधिकारी यांची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने कळविण्यात येतं की,

1) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता या व इतर योजना शासनाच्या महत्वाकांक्षी योजना असून त्यांची काटेकोर व प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाचे निर्देश असल्याने सन 2018-19 मध्ये, आपल्या महाविद्यालयातील / परिसंस्थेतील / विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागातील प्रवेशीत विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण विभागाच्या या व इतर 12 योजनांसाठी ऑन लाईन पध्दतीने डीबीटी पोर्टल द्वारे अर्ज भरले जाणार असल्याने विहीत मुदतीच्या आत सर्व पात्र शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी सहकार्य करावे.

2) मा.प्राचार्य / मा.संचालक यांनी महाविद्यालयांच्या / परिसंस्थेच्या/ विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागाच्या प्रवेशद्वारा जवळ दर्शनी भागात नोटीस बोर्डवर राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व डॉ.पंजाबराव देशमूख वसतीगृह निर्वाह भत्ता व इत्तर उच्च शिक्षण विभागाच्या 12 शिष्यवृत्ती योजनांसाठी शिष्यवृत्तीच्या अटी व शर्ती बाबतची माहिती प्रसिध्द करण्यात यावी.

3) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी अनुज्ञेय शिक्षण शुल्क घेण्यात येवू नये असे शासनाचे निर्देश असल्याने त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

4) डीबीटी पोर्टल वरून महाविद्यालयांना त्यांच्या महाविद्यालयात सुरु असलेले अभ्यासक्रम व त्यांची फी बाबत माहिती भरण्याबाबत सुविधा असल्याने तात्काळ शिष्यवृत्तीचे कामकाज करणाऱ्या लिपीकामार्फत ऑनलाईन भरून घेवून प्राचार्यांनी तात्काळ पुढे ऑनलाईन फॉरवर्ड करावी व त्यामाहिती बाबत हार्ड कॉपी व एक प्रत विद्यापीठास प्रमाणीत करुन पाठवावी म्हणजे विद्यापीठास ऑनलाईन पडताळणी करून विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना फॉरवर्ड करणे सोईचे होईल.

5) आधार क्रमांकाच्या सहाय्याने विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज भरू शकतात तसेच विना आधार क्रमांक या ऑप्शनच्या आधारे विद्यार्थी शिष्यवृत्ती करीता ऑनलाईन अर्ज करू शकतात तथापी संबंधीत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती रक्कम ही त्यांच्या आधार संलग्नीत बँक खात्यामध्ये जमा होणार असल्याने विद्यार्थ्यांचे आधार संलग्नीत बँक खाते असणे आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||


कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University,Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)
परीक्षा गोपनीय (पूर्वार्ध) विभाग

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

दूरध्वनी क्र. : २२५७३२० ते ३२३
फॅक्स नं. : ०२५७-२२५८४०३/४०६
वेब साईट : www.nmu.ac.in


जा.क्र.कबचौउमवि/७-फ/३३३२/२०१९ दिनांक २४/०६/२०१९

**सुधारीत पत्र**

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत
सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य /मान्यता प्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक /
विद्यापीठ शैक्षणिक विभाग व प्रशाळेतील मा.संचालक यांना...

**विषय: विद्यापीठाच्या संगणकीय प्रणालीशी (OAASIS) संलग्नीत होणेबाबत...**

संदर्भ : (१) विद्यापीठाचे जा.क्र.उमवि/२१/अ.मं./१९६/२०१४, दि.०३/०७/२०१४ चे परिपत्रक.
(२) जा.क्र.उमवि/७-अ/३१०९/२०१७, दि.२५/०७/२०१७
(३) जा.क्र.कबचौउमवि/७-फ/५२९६/२०१८, दि.१७/१२/२०१८
(४) जा.क्र.कबचौउमवि/७-फ/३२७९/२०१९, दि.१९/०६/२०१९

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास विदितच आहे की, विद्यापीठाच्या परीक्षेसंबंधी विविध कामांमध्ये सुसूत्रता येण्याच्या दृष्टीने **OAASIS** ही संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली असून, त्याद्वारे विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये व परिसंस्थेतील प्राध्यापकांशी पत्रव्यवहाराद्वारे तात्काळ थेट संबंध प्रस्थापित करता येतात. याबाबत आपणास वरील संदर्भीय पत्रान्वये वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.

**वरील प्रमाणे Registration करण्यासाठी व अद्ययावत माहिती भरण्यासाठी आपणास संदर्भीय क्र. ४ अन्वये कळविण्यात आले होते. तथापि, सदर कार्य पध्दतीच्या Steps मध्ये खालीलप्रमाणे बदल झालेला आहे.**

**New Steps :**

1. Connect to https://onlinekbcnmu.org.in website.
2. Click on **Affiliation** Section.
3. Enter your College **Login ID** and **Password** in Sign in section and click on **Login** button.
4. Click on **Teaching Staff** Section.
5. Re-enter password and click on **Continue** button.
6. Click on **Manage Teaching Staff** Link.
7. To Add / Register New Teaching Staff joined in your college click on the link **"Add New"**.
8. Kindly note that if the staff has been transferred in from some other college of KBCNMU then simply send his/ her OAASIS registered Login ID and your College ID for transferring entire profile of that staff to your college. Do not re-register the same staff again.
9. Send mail to support@onlinekbcnmu.org for such transfer cases.
10. To update details of already registered staff use the link **"Manage Registered Staff"**.
11. For transfer cases click on the link **"Manage Registered Staff"** and then click on X link in the column **"Remove from College List (Transfer Cases)"**
12. For Retired Staff cases click on the link **"Manage Registered Staff"**and then click on X link in the column **"Mark Retired Staff"**.

तेव्हा या संदर्भात आपणास पुनःश्च कळविण्यात येते की, यापूर्वी पाठविण्यात आलेले संदर्भीय पत्र क्र. ४ मध्ये केलेल्या बाबी मध्ये कुठलाही बदल नाही. **तथापि, OAASIS संगणकीय प्रणालीच्या Steps मध्ये वरीलप्रमाणे बदल झालेला असून त्याप्रमाणे नोंद घेवून कार्यवाही करण्यात यावी.** तरी, सर्व प्राध्यापकांची माहिती परिपूर्ण भरल्याची **मा.प्राचार्य** यांनी खात्री करुन घ्यावी. व सदरची माहिती **दि.०२ जुलै, २०१९** पर्यंत **Internet Explorer (Version 8)** या ब्राऊझरवरुन भरण्यात यावी, ही विनंती.

कळावे,

Staff file
सर्व प्राध्यापकांची नोंद घेऊन कार्यवाही करावी
25-6-19

आपला विश्वासू,
Sd/-xxx
(भ.प्र.पाटील)
**संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीसाठी :**

Scanned by CamScanner

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(formerly North Maharashtra University, Jalgaon)

परीक्षा व मूल्यमापन विभाग

जा.क्र.कबचौउमवि/7-ग/364/2019

दिनांक 30.01.2019

प्रति,

1. मा.प्राचार्य/मा.प्राचार्या/मा.संचालक
   कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, परिसंस्था
2. मा.संचालक, विभागप्रमुख,
   विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ

**विषय**:- KBCNMUJ e - suvidha या नावाने विद्यार्थ्यांकरिता Mobile App व या ॲपमध्ये प्राचार्यांकरिता Dashboard बाबत.

महोदय,

विद्यापीठाद्वारे विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानुन विविध योजना राबविण्यात येत आहेत. या करीता परीक्षा विभागाने आपल्या कामकाजामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कामकाज हे पेपरलेस व ऑनलाईन केलेले आहे. विद्यार्थ्यांच्या संबंधित सर्व कामकाजाची माहिती ही संकेतस्थळावर उपलब्ध असते. बहुतांश विद्यार्थ्यांजवळ व महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याजवळ Smart Mobile Phone असल्याने विद्यापीठाने University Mobile App विकसित केलेले आहे. ॲपव्दारे संकेतस्थळावर उपलब्ध असलेली माहिती एका क्लिकवर विद्यार्थ्यांना उपलब्ध होते.

या मोबाईल ॲपचा पुढील भाग म्हणून एमकेसीएलने KBCNMUJ e-Suvidha हे ॲप विकसित केलेले असून या ॲपमध्ये महाविद्यालयीन स्तरावरील विविध सूचना [sms alerts/notification] विद्यार्थ्यांना प्राप्त करण्याच्या हेतूने Push Notification ही सुविधा या मोबाईल ॲपमध्ये विकसित केलेली असून, या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या वैयक्तीक माहिती उदा. परीक्षा अर्ज, प्रवेशपत्र, निकाल इ. माहिती उपलब्ध असणार आहे.

विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन स्तरावर सूचना द्यावयाच्या असल्यास बाब नोटीस बोर्ड किंवा प्रत्येक वर्गात सूचना पाठवावी लागते. या प्रक्रियेमध्ये बराचसा वेळ जातो. या सर्व बाबी टाळण्याकरीता Push Notification[sms alerts] ही सुविधा महाविद्यालयाच्या DU Portal Login मधील College Definition >> Push Event या लिंकवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

महाविद्यालय व विद्यार्थ्यांनी KBCNMUJ e-suvidha ॲप वापरण्यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

1. महाविद्यालय व विद्यार्थ्यांनी Google play वरून KBCNMU e-suvidha हे ॲप डाउनलोड करावे.
2. ज्या विद्यार्थ्यांकडे Online Application /DU Portal वरील Username/password माहित आहे. त्या विद्यार्थ्यांनी Step क्र.3 प्रमाणे कार्यवाही करावी.

...2

Staff file

3.2.1.19

Scanned by CamScanner

# महाराष्ट्र- शासन
## सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव विभाग, जळगांव

महाराष्ट्र जीवन प्राधीकरण कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावर, ग्राहक न्यायालयाच्या मागे,
कार्यालयीन दरध्वनी क्रमांक व फॅक्स : (०२५७) २२३८५१०. E-mail jdhe_jal@yahoo.co.in

जा.क्र. ससं.उशिज/वेतन देयक जानेवार-२०/ २०१९-२०/145 दिनांक.२०.०१.२०२०

प्रति,

प्राचार्य,
सर्व अशासकीय व अनुदानित कला, वाणिज्य,
विज्ञान, विधी, व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
जळगांव, धुळे व नंदुरबार.

**विषय : जानेवारी-२०२०चे वेतन देयक सादर करणे बाबत..**

उपरोक्त विषयान्वये सर्व अशासकीय अनुदानित कला वाणिज्य व विज्ञान विधी महाविद्यालयांचे यांचे माहे **जानेवारी- २०२० चे वेतन देयक तयार करून सादर करण्यासाठी सर्व महाविद्यालयांनी दिनांक. २२.०१.२०२० व २३.०१.२०२० रोजी सोबत जोडलेल्या महाविद्यालयनिहाय दिलेल्या कालावधीत प्रस्तुत कार्यालयात सादर करावीत. तसेच ज्या शिक्षकेतर कर्मचारी यांचे ७ व्या आयोगानुसार वेतननिश्चिती झालेली आहे. त्यानुसार लेखाधिकारी कार्यालयाकडुन वेतन पडताळणी करण्यात आलेली आहे त्याच शिक्षकेतर कर्मचारी यांचे माहे जानेवारी-२०२० च्या वेतन देयकात पगार समाविष्ठ करावा.** तसेच सर्व महाविदयालयांनी दिलेल्या कालावधीतच माहे जानेवारी-२०२० चे वेतन देयक प्रस्तुत कार्यालयात सादर करावे. त्याचबरोबर खालील नमूद केलेली माहिती सादर करावी.

१. शिक्षकेतर कर्मचा-याची यांची ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन देयकात नाव समाविष्ठ केलेल्या एकुण कर्मचा-यांची यादी सादर करावी.

२. वेतन देयकासोवत प्राचार्य, व सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे बायोमॅट्रीक रिपोट सादर करावे.

३. तसेच माहे जानेवारी-२०२० चे वेतन देयकानुसार रिक्त व भरलेली पदांची माहिती सादर करण्यात यावी.

४. जानेवारी २०२० चे वेतन देयक आपल्या Login वरून JD Office च्या Login वर Forward करूनच देयक या कार्यालयात सादर करावे.

५. माहे जानेवारी-२०२० चे वेतन देयकात एकुण किती कर्मचा-यांचे वेतन तयार करण्यात आलेले आहे. त्या कर्मचा-यांची माहीती वेतन देयकावरुन खालील दिलेल्या नमुन्यात सादर करण्यात यावी.

महाविद्यालयाचे नांव---- सेवार्थ डी.डी. कोड-

| Sr No | SEVAARTH ID | EMPLOYEE NAME | Date Of Appoint ment Date | GPF No | DCPS No | EMPLOY EE TYPE | CADRE | POST NAME |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | |

Seshirnd

सहसंचालक, उच्चशिक्षण
जळगाव विभाग जळगाव

Arts College Bamkheda T.T.
Inward No.
Date. / /200 Sign

RAP
22/1/2020

Scanned by CamScanner

# महाराष्ट्र- शासन

## सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव विभाग, जळगांव

महाराष्ट्र जीवन प्राधीकरण कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावर, ग्राहक न्यायालयाच्या मागे,

कार्यालयीन दरध्वनी क्रमांक व फॅक्स : (०२५७) २२३८५१०. E-mail jdhe_jal@yahoo.co.in

जा.क्र. ससं.उशिज/वेतन पथक /२०१९-२०/2347 दिनांक. २२.७.२०१९

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व अशासकीय. व अनुदानित कला, वाणिज्य,
विज्ञान, शिक्षणशास्त्र व विधी महाविद्यालये,
**जळगांव, धुळे व नंदुरबार.**

**विषय : माहे जुलै- २०१९ चे वेतन देयक तयार करून सादर करणे बाबत..**

उपरोक्त विषयान्वये अशासकीय अनुदानित कला वाणिज्य व विज्ञान विधी तसेच शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे माहे **जुलै- २०१९ चे वेतन देयके तयार करण्यासाठी प्रमाणक क्र. व दिनांक. सोबत महाविद्यालयनिहाय यादी जोडलेली आहे. त्यानुसार दिनांक. २५/०७/२०१९ ते दिनांक. २६/०७/२०१९** रोजी वेतन देयक तयार करून सहसंचालक कार्यालयात न-चुकता सादर करावे. जे महाविदयालये दिलेल्या कालावधीत माहे **जुलै- २०१९** चे वेतन देयक सादर करणार नाहीत. व वेतन वेळेत झाले नाहीत. त्यास प्रस्तुत कार्यालय जबाबदार राहणार नाही. याची सर्व प्राचार्य यांनी दक्षता घ्यावी. तसेच माहे जुलै- २०१९ चे वेतन देयकासोबत खालील नमूद केलेली माहिती सादर करावी.

१. जुलै- २०१९ चे वेतन देयकासोबत प्राचार्य, व सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांना वार्षिक वेतन वाढ मंजुरीचे प्रमाणपत्र सादर करावे.

२. जुलै- २०१९ चे वेतन देयकासोबत प्राचार्य, व सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे बायोमॅट्रीक रिपोट सादर करावे.

३. माहे जुलै-२०१९ चे वेतन देयकानुसार रिक्त व भरलेली पदांची माहिती सादर करण्यात यावी.

४. माहे जुलै- २०१९ चे वेतन देयकात एकुण किती कर्मचा-यांचे वेतन तयार करण्यात आलेले आहे. त्या कर्मचा-यांची माहीती वेतन देयकावरुन खालील दिलेल्या नमुन्यात सादर करण्यात यावी.

**महाविद्यालयाचे नांव----** **सेवार्थ डी.डी. कोड-**

| Sr No | SEVAARTH ID | EMPLOYEE NAME | Date Of Appoint ment Date | GPF No | DCPS No | EMPLOY EE TYPE | CADRE | POST NAME |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | |

सहसंचालक, उच्चशिक्षण
जळगाव विभाग जळगाव

Scanned by CamScanner

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव- ४२५००१

## NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON – 425001

रौप्य महोत्सवी वर्ष २०१४-१५

(वित्त विभाग)

Grade- B (2.88)
NACC Re- Accredited

जा.क्र.उमवि/८/ ८५७/२०१४

दिनांक :- १४/०७/२०१४

प्रति,

१) मा.प्राचार्य/संचालक, उमविशी संलग्न सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था

२) मा.संचालक/विभाग प्रमुख, उमवि प्रशाळा/शैक्षणिक विभाग,उमवि ,जळगाव

**विषय :-महाविद्यालय व प्रशाळा यात प्रवेशित विद्यार्थ्यांकडून Du Portal मार्फत विद्यापीठास देय असलेली फी On Line जमा करणेबाबत.**

महोदय;

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाचे परिपत्रक क्र.१२४/२००८, १५०/२००८ व ११४/२०१४ नुसार विद्यार्थ्यांना संबंधित महाविद्यालयात अथवा प्रशाळेत विविध प्रकारचे शुल्क भरावयाचे असतात त्या शुल्कापैकी संबंधित महाविद्यालयाकडून विद्यापीठास देय असलेली रक्कम विद्यापीठास प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातून On Line पध्दतीने शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून MKCL यांनी Develop केलेल्या Du Portal मार्फत स्विकारणेबाबत मा.वित्त व लेखा समितीच्या सभेत ठराव क्र.१२/२०१४-१५ दि.२९.०४.२०१४ अन्वये ठरल्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्यानुसार महाविद्यालयाकडून सदरचे शुल्क On Line प्राप्त व्हावे यासाठी महाविद्यालयांना खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

अ) महाविद्यालय अथवा प्रशाळा यांनी त्यांचे राष्ट्रीयकृत बँकेचे,IFSC Code,Net Banking, NEFT,RTGS सुविधा असलेले Bank Account Details Du Portal वर असलेल्या College Login वरील College Defination या मेनूमध्ये उपलब्ध असलेल्या Bank Details या Link वर दिलेल्या Format मध्ये Save करणे व त्यानंतर त्याच Account चा Cancel झालेला चेक Image दिलेल्या Link वर Upload करुन Update करावा. सदरची कार्यवाही सर्व महाविद्यालयांमार्फत दि.१८ जुलै,२०१४ च्या आत होणे आवश्यक आहे.

ब) महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्याची विद्यापीठास देय असलेल्या शुल्काबाबतची माहिती Du Portal वर उपलब्ध केलेली असून सदर शुल्काचे (Fee Category) ३ प्रकारात वर्गीकरण करण्यात आलेले आहे, ते पुढीलप्रमाणे (१) General (महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थी) (२) Other State Student(इतर राज्यातील विद्यार्थी) (३) Quota/NRI .

Scanned by CamScanner

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव- ४२५००१
NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON – 425001
Grade- B (2.88)
NACC Re- Accredited
रौप्य महोत्सवी वर्ष २०१४-१५
(वित्त विभाग)

जा.क्र.उमवि/८/९९०/२०१४

दिनांक :- ०९/०८/२०१४

प्रति,

१) मा.प्राचार्य/संचालक, उमविशी संलग्न सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
२) मा.संचालक/विभाग प्रमुख, उमवि प्रशाळा/शैक्षणिक विभाग,उमवि ,जळगाव

विषय :-महाविद्यालय व प्रशाळा यात प्रवेशित विद्यार्थ्यांकडून Du Portal मार्फत विद्यापीठास देय असलेली फी On Line पध्दतीने जमा करणे व पात्रता अर्ज सादर करण्याच्या मुदतवाढीबाबत.

संदर्भ :- विद्यापीठाचे जा.क्र.उमवि/८/ ८५७/२०१४ दिनांक १४/०७/२०१४ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार विद्यापीठास देय असलेली फी On Line पध्दतीने जमा करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

upload केलेले Bank Accounts Details विद्यापीठातर्फे approve झाल्यानंतर enable या लिंकला क्लिक करावे.

Student Data Du Portal वर Upload करणेपूर्वी विद्यार्थीनिहाय विद्यापीठास देय असलेले प्रवेश शुल्क बरोबर भरलेले आहे किंवा नाही याची खात्री करणेसाठी College Login मधील Dash Board →Statistical Report मधील Course part Term wise Fee Collection हा रिपोर्ट Generate करुन बघावा.

Data Upload झाल्यावर दुस-या दिवशी College Login मध्ये Course part term wise (Semester wise) Invoice तयार होतील . Invoice बघण्यासाठी College Login मधील Invoice या Link मधील "Make Invoice Payment" या मेनूला Click करावे व चालू शैक्षणिक वर्ष Select करावे. तद्नंतर आपल्यासमोर Cours part term wise Invoices चा तक्ता येईल. विद्यार्थीनिहाय हया Invoice बघण्यासाठी View Invoice या Link ला Click करावे.

उपलब्ध Invoices पैकी ज्या Invoices चे Payment करावयाचे असेल ते Invoices select करावे व खाली असलेल्या "Proceed for Payment " या बटनाला Click करावे. त्यानंतर NEFT/RTGS हा Option Select करुन Proceed ला Click करावे. त्यानंतर आपणाला Select केलेल्या Invoices ची एकत्रित रक्कम व त्या खाली enable केलेल्या Account ची यादी सुध्दा दिसेल. त्यापैकी ज्या Account मधून Select केलेल्या Invoices चे Payment करावयाचे असेल, ते Account Select करावे व Generate Mandate या बटनाला Click करुन Print Mandate या बटनाच्या सहायाने Mandate Print करुन घ्यावे.

पत्र पेटी क्र.: ८०, उमविनगर, जळगाव दूरध्वनी क्र.: (०२५७) २२५८४०८,२२५७२२५ ते २२५७२३८ फॅक्स क्र.: (०२५७) २२५८४०८
Post Box No.: 80, Umavinagar,Jalgaon, Telephone No: (0257)2258408,2257225 to 2257238, Fax No : (0257) 2258408

Scanned by CamScanner

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

## विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये / परिसंस्थांसाठी माहे मार्च /एप्रिल /मे २०२० मध्ये होणाऱ्या परीक्षांकरीता परीक्षा अर्ज सादर करण्याबाबतचे वेळापत्रक

## परिपत्रक क्र. ०२/२०२०

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये / परिसंस्थांमध्ये सुरु असलेल्या सर्व मानव विज्ञान व आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्रे , विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत महाविद्यालयात व परिसंस्थांमध्ये शिकविल्या जाणा-या विविध अभ्यासक्रमांच्या माहे मार्च / एप्रिल / मे / जून २०२० मध्ये होणा-या विविध परीक्षांचे परीक्षा अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक सोबत जोडले असून, वेळापत्रकात नमूद केलेल्या तारखांना सर्व संबंधित विद्यार्थ्यांकडून परीक्षा अर्ज भरुन घेऊन विहीत मुदतीत खालील कार्यपध्दतीनुसार विद्यापीठामध्ये सादर करावेत.

अ) **ई-सुविधेअंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता परीक्षा अर्ज भरण्यासंदर्भात सूचना :-**

एफ.वाय./एस.वाय./टी.वाय.बी.ए.,बी.कॉम.,बी.एस्सी.(CGPA /CBCS पॅटर्न), बी.एस.डब्ल्यु. (CGPA पॅटर्न), बी.बी.एम.,(ई-कॉमर्स.), बी.एम.एस., बी.एम.एस(e-comm), बी.बी.एम.(बी.बी.एस.), बी.बी.ए. (integrated five year)/एम.बी.ए.(integrated) बी.बी.ए., बी.सी.ए., एम.बी.एम. (कॉम्प्युटर पर्सनल)/एम.एम.एस. (कॉम्प्युटर/पर्सनल), एम.ए.सत्र-१ ते ४, एम.कॉम.सत्र-१ ते ४, एम.एस्सी.सत्र-१ ते ४, एम.एस.डब्लू, सत्र-१ ते ४, एम.सी.ए., एम.सी.ए. (Duel) Integrated, एम.बी.एम., एम.बी.ए., बी.एड., बी.पी.एड., बी.पी.ई., एम.एड., एम.पी.एड., बी.ए.एल.एल.बी (प्रथम ते पाचवे वर्ष), एल.एल.बी.(प्रथम ते तृतीय वर्ष), बी.टेक. (प्रथम ते चतुर्थ वर्ष) / एम. टेक. / एम.ई., (प्रथम व व्दितीय वर्ष) एफ.ई., एस.ई. टी.ई.,बी.ई. (CGPA), प्रथम ते चतुर्थ वर्ष फार्मसी (CGPA), एम.फार्म, एल.एल.एम., B.Tech (Cosmetic.)., BFA., MFA., B.Arch., बी.व्होक (सायन्स्)., बी.व्होक., (फॅशन डिझायनिंग)., बी.व्होक. (ब्युटी थेरपी)., बी.व्होक. (जुना व नवीन अभ्यासक्रम), बी.लिब., एम.लिब.

१) शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रवेशित सत्र- २, ४, ६, ८, १० च्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज महाविद्यालयांनी प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन अपलोड केल्यानंतर परीक्षा अर्ज उपलब्ध करुन देण्यात येतील.

२) सत्र १ ते १० च्या ई-सुविधा अंतर्गत अभ्यासक्रमासाठी प्रवेशित नियमित / रिपीटर विद्यार्थ्यांचे प्रिफिल्ड परीक्षा अर्ज ई-सुविधा विभागामार्फत संबंधित अभ्यासक्रमाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून ५ ते ७ दिवसात महाविद्यालयाच्या लॉगीन मध्ये उपलब्ध करुन देण्यात येतील.

३) जे विद्यार्थी वरील प्रिफील्ड अर्ज भरुन विहित मुदतीत महाविद्यालयाकडे जमा करतील अशाच विद्यार्थ्यांचे प्रिफिल अर्ज महाविद्यालयांने ऑनलाईन इनवर्ड करावेत.

४) वरील प्रमाणे इनवर्ड केलेल्या अर्जांची इनवर्ड यादी सोबत जोडलेल्या वेळापत्रकाप्रमाणे निर्धारीत मुदतीत विद्यापीठात जमा करावी.,

५) जे परीक्षा अर्ज ऑनलाईन इनवर्ड होतील, त्यांचे परीक्षा अर्ज महाविद्यालयातच जतन करण्यात यावेत. फक्त इनवर्ड यादया दोन प्रतीत विद्यापीठात जमा कराव्यात.



Scanned by CamScanner

**Rules & Information regarding Eligibility and Verification and Scrutiny of Eligibility Application Forms in respect of various courses of the University.**

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

KAVYITRI BAHINABAI CHAUDHARI NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON

# CIRCULAR No. 102/2019

The eligibility certificate is the essential document for the student to get admission to the chosen course in this University jurisdiction. It is also essential that the process of issuing eligibility certificate should be completed as expeditiously as possible keeping in view the interest of students as also academics. In case such process is delayed or the process becomes faulty for any reason, it will have an adverse repercussion on the students; so much so that the money spent by students vis-à-vis their valuable year may likely to go waste for such undesirable delay in issuing eligibility certificate.

To avoid, therefore, such an eventuality and/or mitigate the same it is necessary that such process should be completed with utmost circumspection and speed. The Director of the School/Head of Department of University Department/Principal of Affiliated Colleges/Director of Recognized Institute are requested to carefully note the following instructions for this purpose.

## 1. GENERAL INSTRUCTIONS:

(i) As per the decision taken by the University authorities, from the academic year 2009-10, the eligibility of students who have passed 10+2 Higher Secondary Examination from Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education and seeking admission for F.Y.B.A., F.Y.B.Com. or F.Y.B.Sc. class should be completed at college level through e-suvidha scheme and as per rules framed by the University.

For the above, the college should collect Rs. 10/- as form fee and Rs. 50/- as eligibility fee from each student. Out of these fees, the college should keep form fee and Rs. 10/- as processing fee from collected fees and should remit remaining fee Rs 40/- per student with the list of admitted students to the University office as per schedule, mentioning clearly about the **eligibility status** of each student who sought admission on the basis of 10+2 Higher Secondary Examination of Maharashtra State.

The Principal of Arts, Commerce and Science colleges are requested to constitute Admission Committee for FYBA, FYBCOM and FYBSC admission purpose and inform the name and of faculty wise committee up to **15th June of every year to the Asstt. Registrar, Admission/ Eligibility section of the University.**



Scanned by CamScanner

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**प्रवेश व पात्रता विभाग** **Admission & Eligibility Section**

जा.क्र. कबचौ उमवि/६/प्रवपाप/३७०/२०१९ दि.०७/११/२०१९

प्रति,
मा प्राचार्य,
कबचौ उमविशी संलग्नीत सर्व कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालये यांना ....

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी प्रथम वर्ष कला, विज्ञान व वाणिज्य वर्गात प्रवेशित विद्यार्थ्यांची पात्रता पडताळणी करण्याबाबत..**

महोदय / महोदया,

[illegible] पडताळणीची कार्यवाही महाविद्यालय स्तरावर झालेली असलेच. यासंदर्भात मला प्राप्त झालेल्या आदेशावरुन आपणास कळविण्यात येते की, मागील वर्षाप्रमाणे या वर्षी देखील प्रथम वर्ष कला, विज्ञान व वाणिज्य अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पात्रतेची पडताळणी विद्यापीठात करण्याचे निश्चित झाले आहे.

त्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या पात्रता पडताळणीच्या कार्यक्रमपत्रिकेनुसार आपल्या महाविद्यालयातील पात्रतेसंबंधी समकक्ष [illegible] कर्मचाऱ्याद्वारे पात्रता अर्जाचे फाईल्स, मूळ गुणपत्रके, शाळा सोडल्याचा मूळ दाखला (T.C), पात्रतेसाठी अनुषंगिक आवश्यक कागदपत्रे, महाविद्यालयातील मंजूर तुकड्या व विद्यार्थी संख्या [illegible] पात्रता शुल्क भरणा केलेल्या पावत्यासह, अतिरिक्त प्रवेश दिलेले असल्यास संलग्नता विभागाने दिलेल्या अतिरिक्त विद्यार्थी वाढीचे मंजुरीपत्रे, पी.आर.एन. नबंरसह प्रोव्हीजनल पात्रता यादी (Provisional Eligibility List) तसेच, महाराष्ट्राबाहेरील प्रवेशित विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज याद्या व इतर आवश्यक दस्तऐवज इ. क्रमाने लावून फाईल्स तयार करुन विद्यापीठास पाठविण्यात यावी व सोबत दिलेल्या नमून्यात विद्याशाखानिहाय परिशिष्ट 'अ' मध्ये माहिती भरुन दोन प्रतीत प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश नोंदणी रजिस्टर (Admission Enrollment Register) सोबत परिशिष्ट 'ब' [illegible] महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांना वेळेत विद्यापीठाच्या प्रवेश पात्रता विभागात मध्य.हजर राहणेबाबत सूचित करावे.

तसेच विद्याशाखानिहाय प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रतेच्या त्रूटीची पूर्तता दिनांक २८/०३/२०२० पर्यंतच करण्यात यावी, जर विद्यार्थ्यांचे त्रिकाल पात्रतेअभावी राखीव राहिले तर विद्यापीठ त्यास जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. तरी आपण यासंदर्भात वैयक्तिक लक्ष घालून संबंधितांना वरील कार्यवाहीबाबत सूचना देऊन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

उपकुलसचिव
प्रवेश पात्रता विभाग

प्रत माहितीसाठी :-

१. मा. [illegible]
२. मा. कुलसचिव कार्यालय कबचौ उमवि, जळगाव
३. मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, कबचौउमवि,जळगांव
४. मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौ उमवि, जळगांव

Scanned by CamScanner

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## प्रवेश पात्रता विभाग

दिनांक :- ०४ जून, २०१९.

जा.क्र.कबचौउमवि/६/प्र.पा./पदव्युत्तर/ ७५ /२०१९.

प्रति,

१) कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे
मा.प्राचार्य / मान्यता प्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक, यांना

२) विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक/शैक्षणिक विभागाचे विभाग प्रमुख यांना

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता एम.ए. व एम.कॉम. इ. पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत...

**संदर्भ :-** विद्यापीठाचे परिपत्रक क्र.१०२/२०१९, दिनांक १५/०५/२०१९

महोदय/महोदया,

आपणास विदितच आहे की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ प्रशाळा / शैक्षणिक विभागातील एम.एस्सी./ एम.ए.(भूगोल) या पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन केंद्रिय पध्दतीने विद्यापीठामार्फत राबविण्यात येत आहे. तसेच एम.एस.डब्ल्यु.या पदव्युत्तर अभ्याक्रमाचे प्रवेश विद्यापीठामार्फत सामाईक प्रवेश परीक्षा घेवून (CET) प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

तसेच एम.ए.(भूगोल व्यतिरिक्त सर्व विषय), एम.कॉम., एम.ए. (जनसंवाद आणि पत्रकारिता) व एम.ए. (डॉ.आंबेडकर थॉट्स) इत्यादी पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रकिया विद्यापीठाशी संलग्नित त्या त्या महाविद्यालयाने, विद्यापीठ प्रशाळेने / शैक्षणिक विभागांनी मागील वर्षाप्रमाणे त्यांच्या स्तरावर गुणवत्तेनुसार यावर्षी म्हणजे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विद्यापीठाने ठरवून दिलेल्या प्रवेश क्षमतेच्या अधिन राहून राबविण्यात यावी. तसेच प्रवेश देते वेळी खालील नमूद बाबी लक्षात घेण्यात याव्यात.

उपरोक्त प्रवेश प्रक्रिया राबवितांना विद्यापीठाने निश्चित केलेल्या नियमांप्रमाणे विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या अधिन राहून शासन निर्णयानुसार पदवी व पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमांची गुणवत्ता यादी जाहिर करुन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावे. गुणवत्ता यादीची एक प्रत महाविद्यालयाच्या सूचना फलकामध्ये लावण्यात यावी. तसेच महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर सदर गुणवत्ता यादी प्रसिध्द करावी व दुसरी प्रत प्रवेश व पात्रता विभाग यांच्याकडे पाठविण्यात यावी. गुणवत्ता यादीवर विद्यार्थ्यांचे काही आक्षेप असल्यास त्यांचे निराकरण करुन प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यात यावी. प्रवेश प्रक्रिया झाल्यानंतर पात्रता अर्जासोबत आवश्यक दस्ताऐवज जोडून पात्रता अर्ज आणि परिशिष्ठ 'ब' विषय निहाय फाईलमध्ये पात्रता विभागास विहित मुदतीत सादर करावेत. विहित मुदतीत पात्रता अर्ज विद्यापीठात जमा करण्यास विलंब झाल्यास त्यास संबंधीत महाविद्यालय जबाबदार राहील. कृपया याची नोंद घ्यावी ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव,
अभ्यासमंडळ व प्रवेश पात्रता विभाग

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :-

१) मा.कुलगुरु कार्यालय, कबचौ उमवि, जळगांव.
२) मा.प्र-कुलगुरु कार्यालय कबचौ उमवि, जळगांव.
३) मा.संचालक,परीक्षा व मूल्यमापन मंडळ, परीक्षा विभाग, कबचौ उमवि, जळगांव.
४) मा.विभाग प्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग, कबचौ उमवि, जळगांव.

☎ :- (९१) ०२५७ - २२५७२९२, २२५७४०८, २२५७२९७, वेबसाईट :- www.nmu.ac.in, ई-मेल :- registrar@nmu.ac.in
फॅक्स क्र:- (९१) ०२५७- २२५८४०३,४०६ प्रवेश पात्रता विभाग, पत्र पेटी क्र. ८०, क.ब.चौधरी उमविनगर, जळगांव -४२५००१

Scanned by CamScanner

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## प्रवेश पात्रता विभाग

विविध विद्याशाखेतील प्रवेश प्रक्रिया आणि शैक्षणिक पात्रता संदर्भात कार्यवाही करणेबाबत.

वाचा :- १) विद्यापीठ परिपत्रक क्र. १०२/२०१९, दिनांक १५/०५/२०१९
२) विद्यापीठ परिपत्रक क्र.१५०/२००८, दि.२६ जून,२००८
३) विद्यापीठाचे परिपत्रक क्र.१५७/२००४, दिनांक ०४ ऑगस्ट,२००४
४) विद्यापीठ पत्र जा.क्र.उमवि/६/पात्रता/३३७/२०१३, दि.०३/०७/२०१३
५) विद्यापीठ पत्र जा.क्र.उमवि/६/पात्रता यादीतील नाव दुरुस्ती/११/२०१८,दि.१७/०१/२०१८
६) विद्यापीठाचे पत्र जा.क्र. उमवि/६/प्र.पा./५१३/२०१५,दि.०८/०९/२०१५
७) विद्यापीठाचे परिपत्रक क्र.२९/२०००, दिनांक १२/०६/२०००

महोदय / महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता संलग्नित महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे व परिपत्रक क्र. १०२/२०१९ अन्वये विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश पात्रतेची नियमावली निर्गमित करण्यात आलेले आहे. परिपत्रक क्र. १०२/२०१९ च्या अधिन राहून प्रवेश प्रक्रियेतील अनुषंगाने सुसूत्रता येण्यासाठी तसेच शैक्षणिक पात्रतेत त्रुटी राहू नये, या करीता खालील सूचनांचे सर्व महाविद्यालयांनी / परिसंस्थांनी काटेकोर पालन करावे.

१) महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया राबवितांना प्रत्येक महाविद्यालयात स्वतंत्र प्रवेश समिती नसल्यास स्वतंत्र प्रवेश समिती स्थापन करण्यात यावी, प्रवेश समितीत किमान दोन मान्यवर अनुभवी प्राध्यापक असावेत व त्या समितीचे अध्यक्ष महाविद्यालयाने नेमावे. प्रवेश समितीने विद्यापीठ परिपत्रकांप्रमाणे प्रवेश द्यावयाचे आहेत. व महाविद्यालयातील प्रत्येक प्रवेश हा समितीमार्फतच होणे आवश्यक आहे. **यासंदर्भातील प्रवेश समिती सदस्यांचे नावे, मोबाईल क्र., ई-मेलसह लेखी स्वरुपात माहिती दि. ०१/०७/२०१९ पर्यंत उपकुलसचिव, प्रवेश पात्रता व अभ्यास मंडळ विभागाकडे विद्याशाखा निहाय कळवावी.** तसेच सदर माहितीसोबत महाविद्यालयाने तयार केलेली प्रवेश माहिती पुस्तीकेची एक प्रत पाठवावी. सदर प्रवेश समितीची यादी व प्रवेश माहिती पुस्तीका विहित मुदतीत विद्यापीठास प्राप्त न झाल्यास सदर महाविद्यालयाचे पात्रता अर्ज स्विकारण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

२) प्रवेश समितीने प्रवेश देतांना विद्यार्थ्यांनी घेतलेले विषयांचे नाव व विषय कोड बारकाइने तपासून घेणे आवश्यक आहे. तसेच सदर विषय आपल्या महाविद्यालयात शिकविला जातो किंवा नाही, सदर विषयास विद्यापीठाची मान्यता असल्याबाबतची खातरजमा करुनच प्रवेश द्यावा. कोणत्याही परिस्थितीत अपुर्ण कागदपत्रांवर किंवा अनुत्तीर्ण विद्यार्थ्याला प्रवेश देण्यात येवू नये. काही विद्यार्थ्यांनी बनावट गुणपत्रक व शाळा / महाविद्यालय सोडल्याचा दाखला सादर करुन बनावट कागदपत्रांच्या आधारे प्रवेश घेतल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास आलेले आहे. त्यास प्रतिबंध व्हावा म्हणून संबंधीत महाविद्यालयाच्या प्रवेश समितीमार्फतच प्रवेश दिले जावेत. असे बनावट कागदपत्रांच्या आधारावर प्रवेश झाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी मा.प्राचार्य यांची राहील.

३) विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, शैक्षणिक पात्रता संदर्भातील सर्व प्रकारचे शुल्क भरण्यासाठी विद्यापीठ शुल्काचा शेअर चार्ट व माईनडेड मध्ये ऑनलाईन सुविधा उपलब्ध असतांना काही प्रकारचे शुल्क रोखीने भरण्यासाठी महाविद्यालयांचे प्रतिनिधी आग्रह धरीत असतात. तरी सर्व प्रकारचे शुल्क विद्यापीठ शुल्काचा शेअर चार्टमध्ये ऑनलाईनेच नमूद करण्यात यावे.

Scanned by CamScanner